सांगवी पोलीस स्टेशन
पोलीस आयुक्तालय पिंपरीचिंचवड
पत्ता - साई चौक, नवी सांगवी, पुणे
संपर्कक्र. ८५३०३९७८३२.

# प्रेसनोट २८/०८/२०२४

## सांगवी पोलीसांची कामगिरी रस्त्यावर पडलेले ८० ग्रॅम वजनाचे सोने सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासुन २४ तासात शोधुन काढले.

दि. २४/०८/२०२४ रोजी रात्रौ ०८/०० वा चे सुमारास महिला नामे निकीता प्रशांत भोसले, वय २२ वर्षे, रा. त्रिमुर्ती कॉलनी, लेन. नं. ५, पिंपळे गुरव पुणे यांचे ८० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असलेले पाकीट कल्पतरु सोसायटी जवळ, जवळकर नगर, पिंपळे गुरव येथे गाडीतुन खाली पाण्याची बॉटल घेण्यासाठी उतरले असताना खाली पडले होते. त्यानंतर सदर महिला पाण्याची बॉटल घेवुन निघुन गेल्यानंतर काहीवेळाने त्यांचे लक्षात आले की त्यांचे पाकीट खाली पडले आहे. त्यानंतर त्यांनी सदर ठिकाणी जावुन पाहिले असता त्यांचे पाकीट त्यांना मिळुन आले नाही. म्हणुन त्यांनी सांगवी पोलीस स्टेशन येथे येवुन सदरबाबत कळविलेनंतर सांगवी पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री महेश बनसोडे सो यांनी तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक ताकभाते यांना सदरबाबत तपास करण्याचे सुचना दिलेनंतर त्यांनी सांगवी पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार पोहवा १५१२ गोडे, पोहवा ७८५ काळभोर, पो.कॉ. ३३३४ कच्छवे यांना योग्य ते मार्गदर्शन करुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सदरबाबत यातील महिला यांना सदरचे सोने असलेले पाकीट कोठे पडले आहे याबाबत काहीएक निश्चीत माहिती नसलेने सांगवी पोलीस स्टेशन कडील पोहवा १५१२ गोडे, पोहवा ७८५ काळभोर, पो.कॉ. ३३३४ कच्छवे यांनी सदर भागातील सुमारे २० ते २५ सी.सी.टी.व्ही. फुटेजची पडताळणी करुन तपासणी केली असता, त्यामध्ये एका फोर व्हिलर मधील इसमाने सदर दागिने घेतले असलेचे दिसुन आले सदर चारचाकी गाडीचा नंबर शोधुन त्याबाबत माहिती घेतली असता सदर चारचाकी गाडी कात्रज येथे असलेचे निष्पन्न झाले. त्यावरुन सदर इसमाचा गाडी नंबरवरुन माहिती काढुन चारचाकी गाडी मालकास संपर्क करुन त्यांनी सोन्याचे दागिने असलेली पर्स मिळाली असलेबाबत सांगुन सदर ८० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने सांगवी पोलीस स्टेशन येथे आणुन जमा केले आहेत. सदरबाबत कोणतीही निश्चित माहिती नसताना सांगवी पोलीस स्टेशनकडील पोलीस स्टाफने अथक पणे सदर सोन्याचे दागिन्यांचा शोध घेतलेला आहे.

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त पिं.चिं., मा. शशिकांत महावरकर सो, सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. वसंत परदेशी सो, अपर पोलीस आयुक्त पिं.चिं., मा. स्वप्ना गोरे मॅडम सो, पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ पिं.चिं., मा. सचिन हिरे सो, सहा.पोलीस आयुक्त सो, पिंपरी विभाग पिं.चिं. यांचे मार्गदर्शनाखाली सांगवी पोलीस स्टेशनचे श्री महेश बनसोडे सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक ताकभाते (तपास पथक), सहा.पोलीस फौजदार वाघुले, पोहवा ७३९ शिंदे, पोहवा ९४८ साळवे, पोहवा ७८५ काळभोर, पोहवा १००४ ढवळे, पोहवा १११० सुपे, पोहवा ११९४ गायकवाड, पोहवा १५१२ गोडे, पोहवा १५३५ मोरे, पो.ना. १५३४ पाटील, पो.कॉ. २०११ पाटील, पो.कॉ. २२०९ डंगारे, पो.कॉ. ३३३४ कच्छवे, पो.कॉ. ३५३८ पाईकराव यांचे पथकाने केली.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप- आयुक्त परि-१
पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड